प्रेस प्रकाशन PRESS RELEASE

भारतीय रिझर्व्ह बँक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in
Website : www.rbi.org.in
ई-मेल email: helpdoc@rbi.org.in

**संचार विभाग**, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
**Department of Communication**, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 022-22660502

जुलै 25, 2019

**श्री भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सहकारी बँक लि., घुलेवाडी, अहमदनगर ह्यांचेवर दंड लागु**

बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या (सहकारी सोसायट्यांना लागु असलेला) कलम 46(4) सह वाचित कलम 47 अ (1)(क) खाली तिला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, भारतीय रिझर्व्ह बँकेने, श्री भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सहकारी बँक लि., घुलेवाडी, अहमदनगर ह्यांचेवर रु.1,00,000/- (रुपये एक लाख) आर्थिक दंड लागु केला असून, तो दंड, युसीबीद्वारे डिव्हिडंड घोषित करणे ह्यावर आरबीआयने दिलेले निर्देश/सूचना/मार्गदर्शक तत्वे ह्यांचे उल्लंघन केले गेले असल्याने लावण्यात आला आहे

भारतीय रिझर्व्ह बँकेने वरील बँकेला एक कारणे दाखवा नोटिस पाठविली होती. त्यावर वरील बँकेने तिचे लेखी उत्तर सादर केले होते. ह्या प्रकरणातील सत्य आणि त्या बँकेने दिलेले उत्तर विचारात घेऊन भारतीय रिझर्व्ह बँकेने निष्कर्ष काढला की वरील उल्लंघने सिध्द होत असून त्यासाठी दंड लावणे आवश्यक आहे.

**योगेश दयाल**
मुख्य महाव्यवस्थापक

**प्रेस प्रकाशन : 2018-2019/246**